# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.
# कोकण परिमंडळ कार्यालय
# ग्राहक तक्रार निवारण मंच रत्नागिरी

---

**ग्राहक तक्रार क्र. ०२/२०१५** **दि. १९.०१.२०१५**

| | |
|---|---|
| **सौ.रश्मी राजन जाधव**<br>**२९९७ सोहं अपार्टमेंट**<br>**२/११ टिळक आळी**<br>**ता. /जिं.रत्नागिरी** | **तक्रारदार ग्राहक** |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| **कार्यकारी अभियंता, महावितरण**<br>**विभागीय कार्यालय रत्नागिरी** | **विरुध्द पक्षकार** |
| **फोरम उपस्थिती** | **१) श्री. व्ही. बी. जगताप,**<br>**सचिव तथा कार्यकारी अभियंता**<br>**२) श्री. ज. पु. बिवलकर**<br>**सदस्य** |
| **ग्राहकाच्या वतीने** | **अनुपस्थित** |
| **विरुध्द पक्षकाराच्या वतीने** | **१) श्री. अनिल वासुदेव महाजन**<br>**कार्यकारी अभियंता,रत्नागिरी**<br>**२) श्री. गोपीचंद बा.घोडके**<br>**अतिकार्यकारी अभियंता**<br>**रत्नागिरी शहर उपविभाग** |

**महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग, ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल (ओम्बुडस्मन) विनियम २००६ मधील ८(२) चे तरतुदीनुसार :**

सौ. रश्मी राजन जाधव,२९९७ सोहं अपार्टमेंट, २/११ टिळक आळी, रत्नागिरी यानी त्यांचे घरगुती कनेक्शनचे नावामध्ये बदल करणेसाठी महावितरणकडे लेखी अर्ज देऊनही कार्यवाही न करता उलट अनावश्यक कागदपत्रांची मागणी केल्याबाबतची तक्रार दि.१९.०१.२०१५ रोजी फॉर्म 'अ' मध्ये या मंचाकडे दाखल केली. तक्रार प्राप्त होताच मंचाकडील पत्र क्र. ०९ दि. २०.०२.२०१५ अन्वये कार्यकारी अभियंता विभागीय कार्यालय रत्नागिरी यांचेकडे स्पष्टीकरण मागविणेत आले. सदर पत्रास अनुसरुन कार्यकारी अभियंता यानी आपले स्पष्टीकरण दि.२१.०१.२०१५ रोजी मंचाकडे सादर केलेले आहे. त्यानंतर अधिनियमामधील तरतुदीनुसार उभय पक्षाना नोटीस काढून दि. २३.०२.२०१५ रोजी सुनावणीची तारीख निश्‍चित करण्यात आली होती.

दरम्यान सुनावणी सुरु होण्याच्या अगोदरच दि.२३.०२.२०१५ रोजी सौ. रश्मी राजन जाधव यानी मंचाकडे स्वतः येऊन लेखी निवेदन सादर केलेले असून त्या निवेदनामध्ये त्यानी, महावितरणने त्यांच्या विनंतीनुसार वीजदेयकाच्या नावामध्ये योग्य तो बदल केलेला असल्यामुळे त्यानी मंचाकडे दाखल केलेली तक्रार मागे घेत असल्याचे नमुद केले आहे. सदर लेखी निवेदनास अनुसरुन मंचाकडून देखील हे प्रकरण निकालात काढणेत येत आहे.

# आदेश

**१) तक्रारदाराची तक्रार निकाली काढणेत येत आहे.**

**२) या आदेशाविरुध्द अर्जदारास अपील करावयाचे असल्यास खालील पत्त्यावर हा आदेश मिळाल्यापासून ६० दिवसात अपील दाखल करता येईल.**

**पत्ता :- सचिव,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग,**
**६०६/६०८, केशवा,**
**बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, मुबंई ४०००५१.**
**फोन नं. ०२२- २६५९२९६५**

**श्री. व्हि.बी.जगताप**
**सचिव / कार्यकारी अभियंता**
**ग्रातनिमं, कोकण परिमंडल**

**श्री.ज.पु.बिवलकर**
**सदस्य**
**ग्रातनिमं, कोकण परिमंडल**

**दिनांक :- १३.०३.२०१५**
**ठिकाण :- रत्नागिरी.**